जावक क्रमांक 9025 /२०२३
बंडगार्डन पोलीस स्टेशन पुणे
दिनांक :- २२/०७/२०२३

प्रति,

मा. जनसंपर्क अधिकारी सो,
पोलीस आयुक्त साहेब कार्यालय, पुणे शहर

यांना सविनय सादर

**प्रतिवेदक :- एम.टी.काळे, सहा.पोलीस उप निरीक्षक, बंडगार्डन पोलीस स्टेशन, पुणे शहर**

यांजकडून विनंती पूर्वक की,

**<u>विषय</u> :- मयत महिलेचे वारसासबंधीने स्थानिक वृत्तपत्रात प्रसिध्दी होणेबाबत.**
**<u>संदर्भ</u> :- बंडगार्डन पोलीस स्टेशन अ. म. र. नं. ११७/२०२३, सी. आर. पी. सी. १७४ प्रमाणे**

---

महोदय,

२/ उपरोक्त विषयान्वये सादर करतो की, बंडगार्डन पोलीस स्टेशन अ. म. र. नं. ११७/२०२३, सी. आर. पी. सी. १७४ मधिल एक अनोळखी महिला, वय अंदाजे ४५ वर्ष, नाव पत्ता माहीत नाही, ही दि. १९/०७/२०२३ रोजी मालधक्का चौकाजवळ, इंडियन पेट्रोलपंपाशेजारी फुटपाथवर, पुणे येथे बेशुद्ध अवस्थेत मिळून आल्याने तिस पुढील उपचारकामी पुणे स्टेशन मार्शलवरील पो.अमं.८८९९ गायकवाड व पो.अमं.४५४२ चव्हाण यांनी खाजगी ॲम्बंलन्समधून ससून हॉस्पीटल पुणे येथे आणले असता तिची डॉक्टरांनी एमएलसी नं. १७४८/२०२३, दि. १९/०७/२०२३ अन्वये तपासणी केली असता तिस डॉक्टरांनी दि.१९/०७/२०२३ रोजी दुपारी १४:०० वा. चे पुर्वी मयत झाल्याचे घोषीत केलेने पोलीस हवा. ९९० श्रीराम यांनी मयत बॉडीचा एक महिला पंच व एक पुरुष पंच यांचेसमक्ष इन्क्वेस्ट पंचनामा करून मयत बॉडी पोस्ट मार्टेमकरीता न्यायवैद्यकीय अधिकारी सो. ससून हॉस्पीटल पुणे यांचेकडे पाठविली असता तेथे मयताचे एमएलपीएम नं. ४२४२/२०२३ अन्वये पोस्ट मार्टेम होवून मयतास मरण हे Septicemia (न्युमोनिया) या नैसर्गिक आजाराने झाले असल्याचे अडव्हान्स सर्टिफिकेट प्राप्त झाले आहे.



**सदर मयत महिलेचे वर्णन खालील प्रमाणे**
**एक अनोळखी महिला, वय अंदाजे ४५, डोक्याचे केस काळे पांढरे रंगाने सावळी, चेहरा उभट, नाक सरळ, नाकातध्ये तारेसारखा धातू, पुढील दोन दातामध्ये फट असून अंगाने मध्यम, उंची ५ फुट ३ इंच असलेली. अंगात मेहंदी रंगाचा त्यावर फुले असलेला कुर्ता.**

तरी दाखल मयत महिलेचे वारसांचा शोध होणेकामी स्थानिक वृत्तपत्रामध्ये प्रसिध्दी होणेस विनंती आहे.

मा.सा.व्हावे.
दि. २२/०७/२०२३

मार्फतीने –

वरिष्ठ पोलीस निरीक्षक
बंडगार्डन पो.स्टे.,पुणे
शहर

(एम.टी.काळे)
सहा.पोलीस उप निरीक्षक
बंडगार्डन पोलीस स्टेशन,पुणे शहर